■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २१२ ■ रविवार दि.२० एप्रिल २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 212 ■ Sunday Dt.20 April 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# ‘लाडक्या भाचीला न्याय द्या’ साक्षीच्या आईची साद, उपमुख्यमंत्री शिंदेंना पाठवलं भावनिक पत्र

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## छेडछाड आणि ब्लॅकमेलिंगला कंटाळून लग्नाच्या दिवशीच तरुणीची आत्महत्या

# उपमुख्यमंत्री साहेब, तुमच्या लाडक्या बहिणीच्या मुलीने गळफास घेत जीवन संपवले!

## स्वप्निल राठोड या पोलीस उपअधीक्षकांनी अपमानास्पद वागणूक दिल्यामुळे त्यांना निलंबित करा?



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. एका तरुणीने छेडछाड आणि ब्लॅकमेलिंगला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. साक्षी कांबळे असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. १४ मार्च रोजी मामाच्या घरात गळफास घेत आत्महत्या केली. एक महिना उलटून गेला असून कुटुंब अद्यापही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यात आता साक्षीच्या आईने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना एक पत्र लिहिले आहे.



एकनाथ शिंदे यांना पाठवलेल्या पत्रात साक्षी कांबळे यांच्या आई म्हणतात, साहेब, मी तुमची लाडकी बहीण. तुम्ही मुख्यमंत्री झाला आणि राज्यातील अस्वस्थ झालेल्या बहिणींना आधार मिळाला. आपण मुख्यमंत्री असताना आपल्या म्हणजेच आम्हासारख्या अगणित बहिणींना भावाचा बंध मिळाला. मी नाराज आहे. आज आपण उपमुख्यमंत्री आहात. मात्र माझ्यासाठी तुम्हीच लाडक्या बहिणीचे मुख्यमंत्री आहात. आज आम्हाला तुमची कमतरता भासते, असे त्यांनी सुरुवातीला म्हटले आहे.

पुढे त्या म्हणतात, माझी मुलगी साक्षी तिला हवाई सुंदरी व्हायचे होते. मात्र एका क्षणात ती नाहीशी झाली.

▶ पान २ वर

### लाडकी बहीण योजना सुरू केली पण..

साक्षीच्या आईने पत्रात म्हटलं की, साहेब, तुम्ही ’लाडकी बहीण’ म्हणत राज्यातील अनेक महिलांना आधार दिला. पण माझ्या लाडक्या लेकीला न्याय कोण देणार? माझी मुलगी साक्षी तिला हवाई सुंदरी व्हायचे होते. मात्र, एका क्षणात ती नाहीशी झाली. काही नराधमांनी तिचं आयुष्य उद्ध्वस्त केलंय. तुमच्या भाचीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. साक्षी आता या जगात परतणार नाही, हे आम्हाला देखील ठाऊक आहे. पण क्रुर नराधमांना शिक्षा झालीच पाहिजे.

### पोलीस यंत्रणेवर गंभीर आरोप

या पत्रात साक्षीच्या आईने पोलिसांवरही गंभीर आरोप केले आहेत. स्वप्निल राठोड या पोलीस उपअधीक्षकांनी आमचं म्हणणं ऐकून घेतलं नाही. उलट आम्हाला अपमानास्पद वागणूक दिली. आरोपींच्या मोबाईलमधील चॅट्स अजूनही उघड करण्यात आलेले नाहीत. आरोपीची बहीण देखील या प्रकरणात सहआरोपी आहे. मात्र, त्याची बहीण पोलीस दलात असल्यामुळे पोलिसांकडून संरक्षण मिळत असल्याचा आम्हाला संशय आहे, असं साक्षीच्या आईने आपल्या पत्रात नमुद केलं आहे.

■ साक्षीच्या आत्महत्यामुळे कुटुंब हतबल, या क्रुर नराधमांना कठोर शिक्षा व्हावी!

■ उपमुख्यमंत्री शिंदे यांनी लाडकी बहीण म्हणत राज्यातील अनेक महिलांना आधार दिला पण या लाडक्या भाचीला न्याय देणार का?

■ आरोपीची बहीण देखील या प्रकरणात सहआरोपी आहे; मात्र पोलीस दलात असल्यामुळे पोलिसांकडून संरक्षण मिळत असल्याचा संशय?

# ’पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा’ उपक्रमात सहभागी व्हा

## पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग मंत्री पंकजा मुंडे

मुंबई । प्रतिनिधी

पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जागतिक वसुंधरा दिन म्हणजे दिनांक २२ एप्रिल, २०२५ ते महाराष्ट्र दिन म्हणजे १ मे, २०२५ या कालावधीत पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने राज्यात ’पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा’ (पर्यावरण बचाओ वसुंधरा सजाओ) हा उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग मंत्री पंकजा मुंडे यांनी केले आहे.



’पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा’ या उपक्रमांतर्गत मंत्री पंकजा मुंडे या स्वतः २२ एप्रिल रोजी मुंबईतील पवई तलाव येथे स्वच्छता मोहिमेत सहभागी होणार आहेत. या उपक्रमात सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.

नदी, नाले, तलाव स्वच्छता अभियानता सहभागी व्हावे श्रीमती मुंडे म्हणाल्या, २२ एप्रिल हा जागतिक वसुंधरा दिवस आहे. या दिवशी आम्ही पर्यावरण ववातावरणीय बदल विभागामार्फत एक अत्यंत चांगली संकल्पना राबवत आहोत. ती संकल्पना म्हणजे जागतिक वसुंधरा दिवसाच्या पासून म्हणजे २२ एप्रिल ते १ मे महाराष्ट्र दिनापर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जसं आपण नवरात्र साजरा करतो, नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा करतो, आराधना करतो, तसंच वसुंधरेची आराधना करण्यासाठी हे नऊ दिवस विविध कार्यक्रम आपण सर्वांनी राबवावेत. २२ एप्रिल रोजी या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. मी स्वतः २२ एप्रिल रोजी पवई लेक मुंबई येथून स्वच्छतेची सुरुवात करणार आहे. दि. २२, २३ आणि २४ एप्रिल रोजी आपण सर्वांनी आपापल्या भागातील,

▶ पान २ वर

# दोघा तरुणांना मारहाण, चौघांवर अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा

केज । प्रतिनिधी

अरुंद रस्त्यामुळे दुचाकी मागे घे म्हणाल्यावरून दोन तरुणांना जातीवाचक शिवीगाळ करीत लाथाबुक्याने व काठीने मारहाण केल्याची घटना डोणगाव (ता. केज) येथे घडली. याप्रकरणी केज पोलिसात चौघांविरुद्ध ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला आहे. धारूर शहरातील पंकज मिलींद गायसमुद्रे (वय २१) हा तरूण केज येथे बीसीएची परीक्षा असल्याने मागील पंधरा दिवसापासून आपल्या मामाच्या गावी डोणगाय (ता. फेज) येथे वास्तव्यास आहे.

१७ एप्रिल रोजी सकाळी पेपर देऊन दुपारी परत डोणगाव येथे गेला. गावातील येडेश्वरी देवीच्या यात्रा असल्याने पंकज हा त्याच्या आत्याचा मुलगा जय शिवमुर्ती हजारे याच्यासोचत दुचाकीवरून मंदिरात दर्शनासाठी गेला. रात्री ७.३० वाजता परत घराकडे येत असताना तुळजाई देवीच्या मंदिराजवळ रस्त्यावर जीप उभी असताना गावातील पप्पु उर्फ मेघराज सिध्देखर घुले व विलास दनु घुले हे दोघे आले, त्यांना जय हजारे हा तुम्ही दुचाकी थोड़ी मागे घ्या, सता लहान आहे, एकच गाडी जाऊ शकते असे म्हणाला असता पणु उर्फ मेघराज याने दुचाकी समोर लावून तुला

▶ पान २ वर

# बीड ते वडवणी रेल्वे इंजिन ट्रायल सुरू

बीड । प्रतिनिधी

अहमदनगर–बीड–परळी रेल्वे मार्गाच्या कामाला गती आलेली आहे. बीडपर्यंत रेल्वे रूळाचे काम पुर्ण झाल्याने आता बीड ते परळी या महत्वाच्या टप्प्याचे काम देखील वेगात सुरू आहे. आज बीड ते वडवणी रेल्वे इंजिन ट्रायल सुरू करण्यात आली.

अहमदनगर येथील रेल्वे स्थानकातून निघालेले रेल्वे इंजिन काल रात्री उशिरा बीडच्या रेल्वे स्थानकात आले होते. त्यानंतर आज सकाळी बीड ते वडवणी रेल्वे इंजिन ट्रायल सुरू करण्यात आली. बिंदुसरा नदीवरील रेल्वे पुलावरून हे इंजिन वडवणीकडे निघाले आहे. दहाच्या स्पिडने या इंजिनची ट्रायल सुरू असुन इंजिनला जोडून असलेल्या मालगाडीत नवीन पटरी आणि रॅक आणण्यात आले आहे. बीड ते वडवणीपर्यंतच्या रेल्वे रूळाचे काम पुर्ण झाले असुन त्याच अनुषंगाने हायस्पीड रेल्वे चाचणीच्या आधी इंजिन ट्रायल घेण्यात आली. या मार्गावर पहिल्यांदाच रेल्वे इंजिनची झुक झुक आयकायला आल्याने लोकांनी हे पाहण्यासाठी गर्दी केली होती.





# तीन गावात १० बोअरचे अधिग्रहण

## केज तालुक्यातील १३ गावातून बोअर अधिग्रहणाची मागणी

केज । प्रतिनिधी

गतवर्षी केज तालुक्यात पाऊसकाळ चांगला झाल्याने मार्च महिन्यापर्यंत पाणी टंचाई भासली नाही. तर एप्रिल महिन्यात तालुक्यातील १३ गावात टंचाई जाणवू लागली आहे. मात्र या गावातून टँकरची नाही, तर बोअर अधिग्रहण करण्याची मागणी करण्यात आली आहे. तहसीलदार राकेश गिड्डे यांनी तीन गावात १० बोअर अधिग्रहण करण्यास मंजुरी दिली आहे.

गतवर्षी १५ ऑगस्टनंतर झालेल्या दमदार पावसाने मांजरा धरण ओव्हरफ्लो झाले होते. लहान – मोठ्या साठवण तलावात ही पाणी साठा झाला होता. शिवाय विहीर आणि बोअरची पाणी पातळी समाधानकारक राहिल्याने रब्बी हंगामात पिकांना पाणी मिळाले. तर पाणी पुरवठा करणारे स्रोत सुरळीत सुरू राहिले. त्यामुळे मार्च महिन्या अखेरपर्यंत तालुक्यातील कोणत्याही गावात पाणी टंचाई जाणवली नाही. मात्र एप्रिल महिन्यात आता टंचाई निर्माण होताना दिसून येत आहे. गावातील सार्वजनिक पाणी पुरवठा करणारे स्रोत बंद पडल्याने सुरुवातीला बोअर अधिग्रहण करण्याची मागणी आलेल्या एकुरका, साबला, बेलगाव या गावचे प्रस्ताव पंचायत



समितीच्या टंचाई विभागाकडून मंजुरीसाठी तहसील कार्यालयाकडे पाठविण्यात आले होते. संबंधित गावाची पाहणी झाल्यानंतर तहसीलदार राकेश गिड्डे यांनी एकुरका व साबला या दोन गावात प्रत्येकी तीन आणि बेलगाव येथे चार बोअर अधिग्रहण करण्यास मंजुरी दिली आहे.

याशिवाय पाणी पुरवठ्याचे स्रोत बंद पडलेल्या जोला गावातून दोन बोअर, कापरेवाडीतून एक बोअर, वरपगावातून तीन बोअर, कोठी गावातून दोन बोअर, ढाकेफळ येथून तीन बोअर, जिवाचीवाडीतून एक बोअर, धर्माळा गावातून दोन भोपला येथून एक बोअर, उंदरी गावातून दोन बोअर अधिग्रहण करण्याच्या मागणीचे प्रस्ताव पंचायत समितीच्या टंचाई विभागाकडे आले होते. या नऊ गावातून १७ बोअर अधिग्रहण मंजुरीसाठी तहसील कार्यालयाकडे पाठविण्यात आल्याची माहिती पंचायत समितीच्या टंचाई विभागाचे कनिष्ठ लिपिक सरदार मासुमदार यांनी दिली. तर बुधवारी आवसगाव येथून ५ बोअर अधिग्रहण करण्याच्या मागणीचा प्रस्ताव पं. स. च्या टंचाई विभागाकडे आल्याची माहिती ही मासुमदार यांनी दिली.

**यंदा टँकर मागणीचे प्रस्ताव नाहीत**

गतवर्षी पाऊसकाळ चांगला झाल्याने तालुक्यात मार्च महिन्यापर्यंत पाणी टंचाई जाणवली नाही. तर टंचाई जाणवू लागलेल्या केज तालुक्यातील १३ गावातून बोअर अधिग्रहण करण्याची मागणी आली आहे. मात्र १५ एप्रिलपर्यंत तालुक्यातील कोणत्याही गावातून टँकर मागणीचा प्रस्ताव आलेला नाही.

## उजनी शुन्यावर, जलसाठ्यांची घसरगुंडी

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील धरणसाठा आता ३८.९५ टक्क्यांवर आला. पुणे, छत्रपती संभाजीनगर, कोकण, विदर्भातील सर्व मोठ्या धरणांचा पाणीसाठा आता झपाट्यानं खाली घसरलाय. एकीकडे तापमानाच्या झळा आणि दुसरीकडे पाणीटंचाई अशा दुहेरी कात्रीत राज्यातील बहुतांश भागातील नागरिक सापडले आहेत. अकोल्यात पाणी चोरीला जाऊ नये म्हणून पाण्याच्या टाक्यांना कुलूप लावले जात आहेत. मराठवाड्यात १०–१२ दिवसांनी एकदा नळाला पाणी येतानाचे चित्र पुन्हा सुरु झाले आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये पाण्याच्या नियोजनावरून नागरिकांमध्ये रोष दिसून येत आहे. राज्यभरात पाणीटंचाईचा प्रश्न चांगलाच पेटला आहे.

**राज्यात किती धरणसाठा शिल्लक?**

महाराष्ट्राच्या सहा महसूल विभागांपैकी पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर या तीन विभागातील धरणांमध्ये आता ४० टक्क्यांहूनही कमी पाणी शिल्लक आहे. पुणे विभागात राज्यातील सर्वात कमी पाणीसाठा आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत काही टक्क्यांनी पाणीसाठा अधिक असला तरी काही प्रमुख धरणे एप्रीलमध्यावरच मायनसच्या दिशेने वाटचाल करू लागली आहेत. त्यामुळे शेतीच्या पाण्यासह पिण्याच्या पाण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. गेल्या वर्षी याच सुमारास पाणीसाठा ३३.६२% एवढा होता. तो यंदा ३८.९५% एवढाच राहिलाय.

राज्यात पुणे विभागातील लघु मध्यम आणि मोठ्या एकूण ७२० धरणांमध्ये आता केवळ ३२.७०% पाणीसाठा शिल्लक आहे. खडकवासला धरण ५१.१२ टक्क्यांवर भरले असून त्यात सध्या २८.५८ दलघमी उपयुक्त पाण्यासाठी आहे. पानशेत धरणात ३४.१०% पाणीसाठा शिल्लक आहे. सांगलीतील वारणा धरण ४०.५६ टक्क्यांवर येऊन पोहोचले आहे. साताऱ्यातील कोयना ३७.२२ टक्क्यांवर आहे. तर सोलापूरमधील उजनी धरण आता शून्यावर पोहोचले आहे. कोल्हापुरातील दूधगंगा २६.४८ टक्क्यांवर असून राधानगरी धरण ५४ टक्क्यांवर आहे.

पान १ वरून...

## उपमुख्यमंत्री साहेब, तुमच्या लाडक्या बहिणीच्या मुलीने गळफास घेत जीवन संपवले!...

काही मुलांनी तिची छेड काढली आणि साहेब तुमच्या लाडक्या बहिणीच्या मुलीने गळफास घेऊन जीवन संपवले. साहेब आम्ही आस धरुन आहोत. तुमची भाची साक्षी या जगात परत येणार नाही, हे आम्हाला देखील माहिती आहे. मात्र त्या क्रूर नराधमांना देखील तेवढी शिक्षा होणे अपेक्षित आहे.

साक्षी कांबळे यांच्या आईने दिलेल्या माहितीनुसार, २० एप्रिल रोजी मुलीचे लग्न होणार होते. पण त्याआधीच छेडछाडीला कंटाळून माझ्या मुलीने आत्महत्या केली. अभिषेक कदम आणि १० ते १२ मुलांची एक टोळी आहे. ही टोळी मुलींना फसवतात, त्यांचे फोटो काढून ब्लॅकमेल करतात. हे एक रॅकेट आहे. यात दोन मुलींचाही समावेश असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अभिषेक कदमवर मकोका लावावा आणि कायमचा जेलमध्ये टाकावा, अशी मागणी पीडितेच्या आईने केली आहे.

दरम्यान, या घटनेवर शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. अंबादास दानवे म्हणाले, राजकीय दबावाला पोलिसांनी बळी पडू नये. बीड प्रकरणात पोलिसांनी मुलाहिजा बाळगू नये. पोलिसांनी कडक कारवाई करावी. मुलींची छेडछाड असेल तर पोलिसांनी कठोर कारवाई करावी, असे दानवे यांनी म्हटले आहे.

**गुन्हेगारांना शिक्षा मिळावी, एवढीच मागणी**

साक्षीच्या आत्महत्येमुळे कुटुंब हतबल झालं असून, गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी साक्षीच्या आईने केली आहे. साहेब, आपण मुख्यमंत्री किंवा गृहमंत्री असता, तर हा गुंड आज जेलमध्ये असता. अजूनही आमचा विश्वास आहे की, आपणच आमच्या मुलीला न्याय मिळवून द्याल. एवढीच आमची विनंती आहे, अशा शब्दात साक्षीच्या आईने पत्राद्वारे आपल्या भावना व्यक्त केल्या.

## 'पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा' उपक्रमात सहभागी व्हा...

आपल्या गावातील, आपल्या तालुक्यातील, आपल्या जिल्ह्यातील, आपल्या महानगरातील नगरातील पाण्याचे विविध स्त्रोत साफ करायचे आहेत. नद्या, नाले, तलाव ह्यांची स्वच्छता करायचे आहे. ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकापासून ते जिल्हा परिषद सीईओपर्यंत, तलाठ्यापासून ते जिल्हाधिकारीपर्यंत, ग्रामपंचायतच्या सरपंच, सदस्यापासून ते जिल्हा परिषद अध्यक्षापर्यंत आणि आमदार, खासदार, पालकमंत्री सर्वांनी यामध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.

याबरोबर शासकीय यंत्रणासमवेत वेगवेगळ्या संघटना, स्वयंसेवी संस्था यांनी देखील याच्यामध्ये सहभाग घ्यावा. नदी – नाले, सरोवर स्वच्छ करणाऱ्या लोकप्रतिनिधीचे अधिकाऱ्याचे आणि सामाजिक संस्थेचे मूल्यमापन करून त्यांचा सुद्धा जिल्हा पातळीवर पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहणानंतर सन्मान होईल आणि राज्यभरातून अशा अत्यंत चांगल्या काम केलेल्या लोकांचा राज्यपातळीवरही सन्मान होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

रीड्यूस, री युज आणि रिसायकल या त्रिसूत्रीचा प्रयोग करणाऱ्यांचा होणार सत्कार त्यानंतर दि. २५, २६ आणि २७ एप्रिल या तीन दिवसांमध्ये विविध संघटना, शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी या सर्वांनी मिळून रीड्यूस, री युज आणि रिसायकल या तत्त्वाप्रमाणे म्हणजे, आपण कुठल्याही चुकीच्या गोष्टींचा वापर कमी करणे म्हणजे रीड्यूस करणे, त्याचबरोबर कोणत्याही चांगल्या गोष्टी ज्या आपण परत परत वापरू शकतो त्यांचा रीयूज करणे आणि कुठल्याही गोष्टी जसे पाणी रिसायकल करतो आणि ते वापरतो त्यामुळे आपण वसुंधरेचा म्हणजे पृथ्वीचा फार मोठा फायदा त्याच्यामधून होतो आणि पर्यायी आपल्याला त्याचा फायदा होत असतो. त्यामुळे या त्रिसूत्री चा वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

श्रीमतीमुंडे म्हणाल्या की, रीड्यूस, री यूज आणि रिसायकल या तत्त्वावर कोणी जर अत्यंत चांगले प्रयोग केले असतील, तर या प्रयोगांचा सन्मान एक मे रोजी महाराष्ट्र दिनी ध्वजारोहणानंतर पालकमंत्र्यांच्या हस्ते त्या त्या जिल्ह्यामध्ये होईल. तसेच हे प्रयोग राज्य पातळीवर मागवून यांच्यामधले उपयुक्त प्रयोगाचे कौतुक करून त्यांचा सन्मान करण्यात येईल. तसेच अश्या प्रयोगाचा उपयोग विविध योजनामध्ये करण्याचा विचार आहे, असेही त्यांनी सांगितले.

घोषवाक्य स्पर्धा घेऊन विजेत्यांना गौरविणार दि.२८, २९ व ३० एप्रिल या तीन दिवसांमध्ये सर्वांनी पर्यावरण बचाव वसुंधरा सजाव या अभियानाच्या माध्यमातून घोषवाक्य (स्लोगन) स्पर्धा घेण्यात येणार आहेत. त्यातील उत्कृष्ट घोषवाक्य तयार करणाऱ्यांचा सन्मान हा महाराष्ट्र दिनानिमित्त करण्यात येईल. तसेच या घोषवाक्याचा समावेश महाराष्ट्र दिनाच्या संचलनात देखील करण्यात येईल.

प्रत्येक जिल्ह्यामधून तीन असे घोषवाक्य घेऊन राज्यस्तरावर तीन उत्कृष्ट घोषवाक्य निवडण्यात येतील. याचा वापर महाराष्ट्राच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या जाहिरातींमध्ये केला जाईल. उत्कृष्ट तीन घोषवाक्य करणाऱ्याचा राज्यस्तरावर सन्मान करण्यात येईल. २२ एप्रिल ते १ मे या कालावधीत आयोजित विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. हे उपक्रम यशस्वी होण्यासाठी लोकप्रतिनिधी तसेच सामान्य नागरिक यांचा सहभाग आवश्यक आहे. त्यामुळे या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.

## दोघा तरुणांना मारहाण, चौघांवर ॲट्रॉसिटीचा गुन्हा...

काय करायचे आहे, तुला कुठुन जायचे ते जा असे म्हणत जातीवाचक शिवीगाळ करीत त्यांनी फोन करून रोहित घुले, बालु घुले यांना बोलावून घेतले. या चौघांनी त्यांना लाथाबुक्याने मारहाण करीत पप्पु उर्फ मेघराज याने काठीने पंकज याच्या डोक्यात मारून डोके फोडून दुखापत केली. अशी तक्रार पंकज गायसमुद्रे याने दिल्यावरून पप्पु उर्फ मेघराज पुले, विलास पुले, रोहित पुले, बाबु घुले या चौपांविरुद्ध फेत्र पोलिसात भीघांविरुद्ध ट्रॉसिटीचा गुन्हा दाखल झाला आहे. तपास सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना हे करीत आहेत.

# सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणी रस्त्यावरचाही संघर्ष

## सुजात आंबेडकर यांचे प्रतिपादन



परभणी । प्रतिनिधी

सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणात एकीकडे प्रकाश आंबेडकर यांच्या माध्यमातून न्यायालयीन लढाई सुरू असून, दुसरीकडे जनतेच्या माध्यमातून रस्त्यावरचाही संघर्ष आम्ही करत आहोत. सोमनाथ हा संविधानप्रेमी होता. न्यायालयीन कोठडीत पोलिसांनी त्याच्यावर अत्याचार करून त्याचा बळी घेतला. मात्र, वंचित बहुजन आघाडी सोमनाथच्या कुटुंबासोबत असून, न्याय मिळेपर्यंत स्वस्थ बसणार नाही, असे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे नेते सुजात आंबेडकर यांनी केले.

सोमनाथ सूर्यवंशी, तसेच आंबेडकरी तरुणांवर झालेल्या अन्यायाविरुद्ध न्याय मिळण्यासाठी 'शांतता मार्च' आयोजित करण्यात आला होता. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील आंदोलन मैदानावर या 'शांतता मार्च'चे सभेत रूपांतर झाले. या वेळी वंचित बहुजन आघाडीचे स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. शनिवार बाजार परिसरातून सुरू झालेला हा शांतता मार्च शहरातील मुख्य रस्त्याने जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत येऊन पोहोचला.

शांतता मार्च शहरातील शनिवार बाजार येथून निघून गांधी पार्क, नारायण चाळमार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील आंदोलन मैदानापर्यंत काढण्यात आला. पुढे बोलताना आंबेडकर म्हणाले की, विटंबना प्रकरणानंतर पोलिसांनी केलेल्या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये आंबेडकरी तरुणांना पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर मारहाण केली. मारहाणीत महिलांनादेखील सोडले नाही. आंबेडकरी वस्त्यांमध्ये जाऊन कोम्बिंग ऑपरेशन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणाविषयी चुकीची माहिती दिली, असा आरोपही या वेळी त्यांनी केला.

या वेळी सोमनाथ सूर्यवंशी यांची आई विजयाबाई यांनी भावना व्यक्त करताना सांगितले, की सोमनाथच्या मृत्यूनंतर देशभरातील अनेक पक्षांचे आमदार, खासदार, राजकीय नेते, मंत्री आले, पण बाळासाहेब आंबेडकर मात्र आमच्यासोबत सुरुवातीपासून सोमनाथच्या न्यायासाठी आहेत. या वेळी विजयाबाई यांनी आपल्या मुलाच्या मृत्यूस पोलीस प्रशासनच कारणीभूत असून, पोलीस प्रशासनाने सोमनाथचा खून केला याचा पुनरुच्चार करत आरोपींना शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी केली. वंचित बहुजन आघाडीच्या या शांतता मार्चमध्ये शहरातील आंबेडकरी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# राजकारणाचे बाळकडू, समाजकारणाची शिदोरी या बळावर – दीपक (तात्या) आतकरे यांची मोठी भरारी

## शिवछत्र परिवाराच्या सदैव सोबत असणारे सहकारी

कार्यकर्ता कोणाला म्हणायचं तर जो सामाजिक बांधिलकी जोपासत कार्य करत असतों किंवा मन लावून काम करत असतों त्याला कार्यकर्ता म्हणतात पक्ष आणि नेता यामधला दुवा कार्यकर्ता असतों आपली भूमिका आणि जन आंदोलने लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम कार्यकर्ता करत असतों लोकांचे प्रश्न हाताळल्याने कार्यकर्त्याला जनतेचा पाठिंबा मिळतो अशीच भूमिका सामान्य कार्यकर्ता ते तात्या आमचा लोकनेता अशी ओळख निर्माण करणारे शिवछत्र परिवाराला लोकसंग्रह मिळवून देण्यासाठी महत्त्वाची भूमिका घेणारे दीपक तात्या आतकरे होय.

शिवछत्र परिवाराचा निष्ठावंत मावळा म्हणून सर्वगुणसंपन्न काम करत असताना सर्व–धर्मसमभाव आणि दिलखुलाशपणे लोकांच्या प्रश्नांची जाण असणारा एकमेव तरुण नेतृत्वाची क्षमता असलेला प्रामाणिक माणूस म्हणजे तात्या आहेत त्यामुळे शिवछत्र च्या तालमीत तसेच गेवराई शहरातील चळवळीचे नाव दीपक तात्यांना ओळखले जाते. अखिल भारतीय मराठा महासंघाच्या चळवळीत त्यांनी काम केले आहे. ते काम करत असताना मित्र परिवारांचा खूप मोठा गोतवळा त्यांनी जमवला त्यामधील काही त्यांचे सहकारी मित्र व्यवसायात अग्रेसर झाले.माजी नगराध्यक्ष महेश अण्णा दाभाडे ,मोट सर, बंडू दादा मोटे , यांच्या निवडणुकीच्या काळात जीवाभावाच्या वरती मेहनत तात्यांनी घेतली. त्या उमेदवारांना कधी मागे पाहू दिले नाहीं सोबतचा कुणी असो अडचणी सापडला की त्यांच्या मदतीला धावून येण्याचे काम त्यांनी केलेले आहे आपल्या माणसाची साथ सोडायची नाही असे त्यांचे ब्रीद वाक्य नेहमीच चर्चेत असतात. त्यांचा परिवार खूप मोठा आहे १८ भाचे आठ बहिणी एक भाऊ यशराज आतकरे (मुलगा) असा परिवार यांच्या सोबत आहे एवढा मोठा परिवार सोबत घेऊन चालत असताना आपले सर्व सहकारी व युवकांना कशी मदत करता येईल हा मानस ठेवून तात्या सातत्याने मदत करत असतात तात्या एक विचार आहेत एकमेव माणूस म्हणजे तात्या त्यांच्या हातून अनेक गोरगरिबांचे कल्याण




झाले आहे. तात्यांच्या हातून चांगुलपणाची चमक दिसून येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अमरसिंह पंडित साहेब यांनी पूर्ण गेवराई शहराची जबाबदारी आता तात्यांकडे सोपविली आहे. तात्यांनी राजकीय जीवनात खूप चढउतार पाहिले कुटुंबात कुठलेही राजकीय वलय नसताना केवळ स्वतंत्र ओळख निर्माण करत शहरातील काही सामाजिक राजकीय पटलावर त्यांनी आपल्या अस्तित्वाचा झेंडा रोवला आहे कुठल्याही संकटकाळात कार्यकर्त्यांनी फोन केला की काम झालं समजा आणि समोरच्याचे समाधान करण्याचे काम तात्या नेहमी करतात सामाजिक दृष्ट्या काम करत असताना त्यांचा प्रभाव वाढत गेला. तरुणांच्या गळ्यातील ताईत बनले आहे तात्यांनी कुठल्याही मोहाला मोठेपणाला बळी न पडता निष्ठेने काम केले आहे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ध्येय धोरणे विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचणे त्यांचं पातळीवर त्यांना नेतृत्व करण्याची संधी मिळाली. माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब व जयसिंह पंडित साहेब तसेच आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या दीपक तात्या आतकरे यांनी पक्ष तत्त्वनिष्ठा कायम अंगी बाळगली. सत्ता असो किंवा नसो कायम पंडित कुटुंबिया सोबत ते प्रामाणिक राहिले त्यांच्या जागी जर दुसरा कोणी व्यक्ती असता तर लाभाचे पद मिळवण्यासाठी पक्ष त्याग केला असता आज अनेक कार्यकर्ते आहेत की ते लोभापाई पक्ष सोडून जातात पण तात्याने सत्ता नसल्यावरही शिवछत्र परिवाराची साथ सोडली नाही हेही तितकेच खरे आहे. तात्या सर्वसामान्याला सोबत घेऊन चालणारे नेतृत्व असुन तात्यांच्या हातून समाजकार्य घडावे याबरोबर गरजवंतांच्या मदतीसाठी तात्यांनी नेहमीच अग्रेसर राहतील तात्यांनी शैक्षणिक दृष्ट्या विद्यार्थ्यांच्या हितासाठी तुळजाभवानी इंग्लिश स्कूलची स्थापना केली त्या इंग्लिश स्कूलच्या माध्यमातून अनेक शालेय विद्यार्थ्यांनी आपले वर्चस्व जिल्हाभरात गाजवून दाखवले. त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन तात्या वेगवेगळ्या कार्यक्रमात करत असतात. प्रशासकीय कार्यालयात तात्यांनी आपली छाप उमटवलेली आहे राजकीय जीवनाच्या पटलावर कार्य करत असताना देशाचे भविष्य असणारे विद्यार्थी यांच्या गुणवत्तेवर लक्ष्य ठेवणारे तात्या खरोखरच देवदूत आहेत त्यामुळे तुळजाभवानी मातेच्या आशीर्वादाने बहरलेला सह्याद्री दीपक तात्या यांनी अनेक गोरगरीब लोकांचे कल्याण केले आहे तात्यांनी कार्यकर्ता ते नेता असा प्रवास करत यशाची भरारी घेतली आहे आज तात्यांचा वाढदिवस आहे तात्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा...

**लेखक –शुभम घोडके पत्रकार, गेवराई मो. ८३०८३९०००८**

# वनक्षेत्रातील पाणवठे कोरडेठाक; तहानलेल्या वन्य प्राण्यांची मानवी वस्तीकडे धाव

## रस्त्यालगत पाणवठे असल्याने अपघाताचे प्रमाण वाढले : डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

सध्या उन्हाचा पारा वाढत असल्याने बाष्पीभवनाचा वेग आधिकच वाढला असून परीणामी साठवण तलाव आणि धरणाच्या पाण्याने तळ गाठला असून बीड तालुक्यातील करचुंडी वनक्षेत्र अंतर्गत बेलगाव, पिंपरनई, फुकेवाडी, सोमनाथवाडी, लगत असलेल्या वनक्षेत्रातील हरिण, मोर, लांडोर, वानर आदी वन्यजीव वनक्षेत्रातील कृत्रिम पाणवठे कोरडेठाक पडल्याने गाव तलावाकडे धाव घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे. काही वर्षांपूर्वी पोखरी (घाट) येथील गावतलावावर पाण्याच्या शोधार्थ आलेल्या लांडोराचा कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्यु झाला होता.

वनविभागाने कृत्रिम पाणवठे तयार केले आहेत मात्र त्यात नियमित पाणी सोडण्यात येत नाही. महिनाभरापुर्वी सोडलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात शेवाळ साचल्याने पाणी पिण्यास योग्य नाही. वनविभागाने वन्यप्राण्यांसाठी नियमित पाणवठ्यात पाणी सोडणे आवश्यक आहे. परंतु त्यात नियमितता नसल्याने काही पाणवठे कोरडेठाक तर काही पाणवठ्यात शेवाळ आढळून आले आहे. पिंपरनई शिवारातील पाणवठा रोडलगत बांधण्यात आला असुन रोडवरून जाणाऱ्या वाहनांच्या धडकेने वन्यजीव मृत्युमुखी पडल्याच्या दुर्दैवी घटना



घडलेल्या आहेत. वनविभागाने नियमित वन्यप्राण्यांसाठी पाणवठ्यात पाणीपुरवठा करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# महाराष्ट्रात १ लाखांपर्यंत कॅशलेस उपचाराची सुविधा उपलब्ध

## अपघातग्रस्त रुग्णांसाठी मोठा दिलासा

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र आरोग्य विभागाने अपघातग्रस्त रुग्णांसाठी एक मोठा आणि दिलासादायक निर्णय घेतला आहे. आता अपघातग्रस्त रुग्णांना १ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस उपचाराची सुविधा मिळणार आहे. सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा महत्वाचा निर्णय घेण्यात आला.



या निर्णयामुळे अपघातग्रस्त रुग्णांना तात्काळ दर्जेदार आणि मोफत उपचार मिळणे शक्य होणार असून, त्यासाठी अंगीकृत तसेच अन्य तातडीच्या रुग्णालयांमध्ये आवश्यक त्या सुविधा पुरवण्यात येणार आहेत. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी संबंधित रुग्णालये, सोसायटीचे अधिकारी आणि अंमलबजावणी संस्था यांनी काटेकोर दक्षता बाळगण्याचे आदेश देण्यात आले आहेत. गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचेही मंत्री आबिटकर यांनी स्पष्ट केले.

वरळी, मुंबई येथील राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या मुख्यालयात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेच्या आढावा बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीस अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी आणखी काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये अंगीकृत रुग्णालयांची संख्या १७९२ वरून ४१८० पर्यंत वाढविणे, उपचार पद्धती व दर यामध्ये सुधारणा करणे, महागड्या उपचारांचा समावेश करणे व प्राथमिक आरोग्य सेवा योजनेत समाविष्ट करण्यासाठी अभ्यास समिती गठित करण्यात आली आहे. या समितीने एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा, असे आदेशही मंत्री आबिटकर यांनी दिले. हा निर्णय अपघातग्रस्त रुग्णांना नवा दिलासा देणारा ठरणार असून, आरोग्यसेवेतील एक मोठी सकारात्मक पाऊल म्हणून पाहिला जात आहे.

# बुद्धगया येथील महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ बेमुदत धरणे आंदोलन करणार : कांबळे

आष्टी । प्रतिनिधी

भारतात संविधान लागू होण्या अगोदरचा बीटीएमसी १९४९ ॲक्ट रद्द करून महाबोधी महाविहार बौद्ध भिकू संघाच्या ताब्यात देण्यात यावे. ज्या ठिकाणी सिद्धार्थ गौतमला ज्ञानप्राप्ती झाली ते ठिकाण जगातील सर्व बौद्ध अनुयायांचे स्थान आहे. त्यांच्या अस्मितेचा प्रश्न आहे. या देशात वाढत चाललेली महागाई, बेरोजगारी, शेतकरी आत्महत्या, विद्यार्थी आत्महत्या यांना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करून त्यांच्या अडचणी दूर कराव्यात, तसेच शेतकऱ्यांचा ७/१२ कोरा करूत अशी घोषणा करण्यात आली होती, ती पूर्ण करा भूमिहीन शेतमजूर यांना १९९० पर्यंत कसत असलेल्या गायरान धारकांचे नावे सातबारा देण्यात यावेत. निराधार योजनेतील बोगस कारभार थांबवून खऱ्या निराधारांना आधार द्यावा. दलित, आदिवासी व इतर मागासवर्गीय यांच्या वरील होणारे अन्याय अत्याचार थांबवून दोषी आरोपीवर कठोर कारवाई करण्यात यावी. जो जनसुरक्षा कायदा करण्यात आला आहे तो रद्द करण्यात यावा. ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी आहे.



समाजाने, संघटनांनी सामाजिक प्रश्नावर आवाज उठवू नये यासाठी अशा कुटिल काररस्थांचे कायदे आणून जनतेस वेठीस धरण्याचे काम या माध्यमातून होत आहे. याला आळा घालावा येणाऱ्या निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात. कारण जनतेमध्ये ई.व्ही.एम. बाबतीत जो समज गैरसमज पसरलेला आहे तो दूर होऊन मतदाराचा मूलभूत मताचा अधिकार अबाधित राहील. भोळ्या भाबड्या जनतेची पिळवणूक थांबवावी संतोष कांबळे विधानसभा अध्यक्ष (बसपा) यांनी लेखी निवेदनाद्वारे तहसील कार्यालय आष्टी यांना कळवलं आहे

याकरीता येणाऱ्या २१ एप्रिल २०२५पासून या मुद्द्यांना घेऊन तहसील कार्यालय आष्टी, जिल्हा बीड येथे बेमुदत साखळी धरणे आंदोलनाला बसत आहोत. अशी माहिती संतोष कांबळे विधानसभा अध्यक्ष (बसपा) आष्टी पाटोदा, शिरूर यांनी लेखी निवेदनाद्वारे दिली आहे.

## भव्य रक्तदान शिबिर व हृदयरोग तपासणी आरोग्य तपासणी



बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ढेकनमोहा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व माजी सरपंच नागेश शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवार दिनांक २१/०४/२०२५ रोजी सकाळी ९ वाजता खेडकर हॉस्पिटल ढेकनमोहा येथे होणार आहे. तरी आपण या शिबिरास उपस्थित रहावे.



धोंडराई येथील आमचे सहकारी मित्र श्री.सार्थक खरात यांची बहिण चि. सौ. का गायत्री व चिरंजीव अमर यांच्या शुभविवाह सोहळ्याच्या निमित्ताने उपस्थित राहून नव वधू वरांस पुढील वैवाहिक जीवनाच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी उपस्थित अनेक ज्येष्ठ व युवा सहकाऱ्यांची भेट व हितगुज या विवाह सोहळ्याच्या निमित्ताने साधता आला.प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर, दोन्ही परिवारातील नातेवाईक आप्तेष्ट व समवेत आलेले आदी युवा सहकारी उपस्थित होते.

# फडणवीस, शिंदे यांनी राज ठाकरेंकडे वारंवार जाऊ नये : रामदास आठवले

लातूर । प्रतिनिधी

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांच्या घरी वारंवार जाऊ नये. राज ठाकरे हे मुंबईचे अर्थकारण बिघडवणारे व्यक्तिमत्त्व असल्याचा आरोप केंद्रीय समाज कल्याण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पत्रकार परिषदेत केला. शनिवारी आठवले लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. शासकीय विश्रामगृहावर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



आठवले म्हणाले, राज ठाकरे हे प्रत्येक वेळी नवे विषय काढून समस्या निर्माण करत आहेत, लोकांमध्ये गैरसमज वाढवत आहेत. मुंबईचे अर्थकारणच त्यांच्यामुळे बिघडत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वारंवार राज ठाकरेंच्या भेटीसाठी जाऊ नये, असा सल्लाही आठवले यांनी दिला. आठवले म्हणाले, राहुल गांधींचे नेतृत्व हे ताकदवान नाही, त्यामुळे त्यांच्या नेतृत्वात कॉंग्रेस फोफावणार नाही. २०२९ व २०३४ अशा पुढच्या दहा वर्षांत पुन्हा नरेंद्र मोदीच पंतप्रधान राहतील, असे भाकीतही त्यांनी वर्तवले.

पहिलीपासून हिंदी विषय सक्तीचा असणे त्यात गैर नाही, हिंदी सर्वांना आली पाहिजे असे म्हणत राज्य शासनाच्या निर्णयाचे त्यांनी समर्थन केले. प्रकाश आंबेडकर यांनी त्यांचा वंचित विकास पक्ष विसर्जित करावा व त्यांनी रिपाइंमध्ये यावे व अध्यक्षपद स्वीकारावे असेही आठवले म्हणाले.

# टोमॅटोचे दर पाच रुपये किलोपर्यंत गडगडले

नांदेड । प्रतिनिधी

उत्पादन खर्चापेक्षा कमी भाव मिळत असल्याने आज नांदेडसह अर्धापूर तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी टोमॅटो रस्त्यावर फेकून दिले. सहा महिन्यांपूर्वी टोमॅटो २०० रुपये किलो दराने विकले जात होते. त्यावेळी सरकारने अन्य देशातून टोमॅटोची आयात केली. याच काळात शेतकऱ्यांनी लागवड केल्याने नांदेड शहर, अर्धापूर, भोकर तसेच अन्य काही तालुक्यातील शेतकऱ्यांनी टोमॅटोची मोठ्या प्रमाणावर लागवड केली होती. घाऊक बाजारात पाच रुपये किलो एवढा दर गडगडला आहे.



लाखो रुपये खर्च करून शेतकऱ्यांनी टोमॅटोचे उत्पादन घेतले खरे, पण आवक जास्त आणि मागणी कमी झाल्याने टोमॅटोचे दर कोसळले. उत्पादन खर्चही न निघाल्याने संतप्त शेतकऱ्यांनी शनिवारी अनेक ठिकाणी रस्त्यावर टोमॅटो टाकून पायदळी तुडविले. अर्धापूर तालुक्यातील कोंढा येथील शेतकऱ्यांनी आज आंदोलन करत शासनाकडून मदतीची मागणी केली आहे. टोमॅटोसह अन्य पिकांचे दर घसरल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. कधी अतिवृष्टी, कधी गारपीट तर कधी दुष्काळ अशा नैसर्गिक चक्रव्यूहात अडकलेल्या शेतकऱ्यांना मदतीची नितांत गरज आहे. भाजीपाल्यासह हळद, सोयाबीन या पिकांना हमीभाव मिळत नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे.

माझ्याकडे दीड एकर टोमॅटो लागवड झालेली होती. त्यात आजपर्यंत एकूण दोन लक्ष रुपये खर्च झाला आहे. बाजारात ४० कॅरेट टोमॅटो विक्रीस नेले असता ५५ रुपये प्रति कॅरेट खर्च आला आहे. त्यामुळे प्रति कॅरेट १५ रुपये खर्च अंगावर आला आहे. टोमॅटो विक्रीतून ६०० रुपयांचे नुकसान झाले.

–गजानन पाटील कदम कोंडेकर, कोंढा, ता अर्धापूर, जिल्हा नांदेड

# डॉ. वळसंगकर आत्महत्याप्रकरणी रुग्णालयातील महिला कर्मचाऱ्याला अटक

सोलापूर । प्रतिनिधी

सोलापुरातील प्रख्यात मेंदूविकार तज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर (वय ७०) यांच्या आत्महत्याप्रकरणी त्यांच्याच रुग्णालयातील एका महिला कर्मचाऱ्याला पोलिसांनी रविवारी अटक केली आहे. संबंधित महिलेवर आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप होता. हा प्रकार अंगलट येऊ नये म्हणून ही महिला कर्मचारी डॉ. वळसंगकर यांना सतत धमकावत होती, असा आरोप आहे. त्यास कंटाळून त्यांनी आत्महत्या केल्याच्या आरोपावरून पोलीस तपास सुरू आहे.



ही महिला एका राजकीय पक्षाच्या स्थानिक नेत्याशी संबंधित आहे. तिच्याविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात पुन्हा दाखल झाला आहे. डॉ. वळसंगकर यांचे पुत्र, मेंदूविकार तज्ज्ञ डॉ. अश्विन वळसंगकर यांनी याबाबत दिलेल्या फिर्यादीनुसार ही कारवाई करण्यात आली.

संबंधित महिला डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या एसपी इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरोसायन्स रुग्णालयात नोकरीस होती. या रुग्णालयात आर्थिक गैरव्यवहारातून ती अडचणीत आली होती. मात्र यानंतरही डॉ. अश्विन वळसंगकर यांनी तिला वेळोवेळी सहकार्य केले. परंतु तरीही ती, कारवाई केली तर आत्महत्या करण्याची धमकी डॉ. शिरीष वळसंगकर यांना देत होती. डॉ. वळसंगकर तिच्या सततच्या त्रासाला वैतागले होते. त्यातूनच त्यांनी मोदीखान्यातील आपल्या राहत्या घरी गोळ्या झाडून आत्महत्या केली. या घटनेमुळे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्राला धक्का बसला. पोलिसांनी या घटनेची अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करून तपास हाती घेतला असता, हा प्रकार उघडकीस आला. सदर बाजार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित लकडे पुढील तपास करीत आहेत.


# जनतेच्या हितासाठी आयुष्य अर्पण करणारे मा.बाबुराव पोटभरे यांचा अभिष्टचिंतन सोहळा..

आदरणीय साहेब सर्व प्रथम आपणास वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. आपणास आमचही आयुष्य लाभो, आणि गेल्या ३५–४० वर्ष्यापासून आपल्या जे काही बहुजन समाजासाठी करताय त्याला अजून बळ मिळो साहेब आमच्या आयुष्यात दोन दिवस खुप महत्वाचे आहेत. एक म्हणजे १४ एप्रिल १८९१ ज्या दिवशी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर या युग पुरुषाचा जन्म झाला आणि लाखो करोडो दीन दुबळ्या समाजाच्या आयुष्याचं सोनं झाले आणि दुसरा दिवस म्हणजे तुमचा जन्म २१ एप्रिल साहेब तुमच्या जन्माने या राज्यातील असंख्य बहुजन समाज निधड्या छातीने आज दिमाखात वावरत आहे. आज कोणतंही पद नसतांना गेल्या अनेक वर्ष्यापासून तुमच्या बंगल्याच्या पायरी वरून एकही गरीब खाली हाताने परत गेलेला नाही. मा.साहेब आज तुमच्या असण्याने कित्तेक गोर गरिबांना, राजकीय, शैक्षणिक आणि वयक्तिक क्षेत्रात मानाचं स्थान मिळालेलं आहे. आपण गेल्या अनेक वर्ष्यापासून समाजाचं कवच कुंडल म्हणून काम करत आहात आणि त्यामुळेच आज महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक समाज बांधव निवांत आरामात आपलं जीवन जगत आहे.

या जिल्ह्यातील हजारो एखाद्या मुलीचा संसार सुखी व्हावा म्हणून तुम्ही जीवच रान करत असता. समाजाचं प्रतिनिधित्व करत असतांना तुमच्या वर अनेक आरोप झाले, हल्ले झाले, एवढेच काय तर सात वेळा गोळीबारहि झाला. साहेब एवढं आमच्यासाठी कोन्हीही केलं नसतं, पण तुम्ही स्वतःच्या कुटुंबाची आणि जीवाची परवा न करता गेल्या ४० वर्ष्या पासून अहोरात्र संघर्ष करत आहात, हे आमचं खुप मोठ भाग्य समजतो.

तुमचे बहुजन समाजावरील उपकार या जन्मात तर फिटणार नाहीत हे मात्र नक्की मा.साहेब या वाढदिवसाच्या निमित्ताने आपणास दीर्घायुष्य लाभो आणि समाजाचा कोहिनुर हिरा म्हणून आपला नाम उल्लेख व्हावा हीच मंगलमय शुभेच्छा...


सदैव ऋणात
मा.नितीन केशरबाई आश्रुबाराव काळे
बहुजन विकास मोर्चा प्रमुख




# आरोपींना राजकीय वरदहस्त असल्याने अटक नसल्याची चर्चा

## वकील महिलेने घेतली जिल्हा पोलीस अधीक्षक यांची भेट
## आरोपींना तात्काळ अटक करा - वर्षाताई जगदाळे

बीड । प्रतिनिधी
अंबाजोगाई तालुक्यातील सनगाव येथे एका वकील महिलेस गावातील सरपंच व त्यांच्या सहकार्याने जेसीबीच्या पाईपने अमानुष मारहाण करण्याच्या घटनेने संपूर्ण बीड जिल्हा हादरला होता. प्रकरणाची प्रसार माध्यमातून माहिती व फोटो व्हायरल झाल्यानंतर पोलीस प्रशासन जागे झाले. या गंभीर प्रकरणात गुन्हा नोंद करण्यात आला असून अद्यापही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. एका महिला वकिलास गावातील गावगुंड रिंगण करून मारहाण करतात या घटनेची दखल गांभीर्याने घेतली जात नाही. या गावगुंडांना राजकीय वरदहस्त प्राप्त असल्याने अद्यापही पोलिसांना या आरोपींना पकडण्यात यश आले नाही. सनगाव येथे पीडित कुटुंबीयांची विविध सामाजिक संघटना व




राजकीय पक्षांनी भेट घेतली या पीडित कुटुंबाची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी भेट घेत मनसे खंबीरपणे कुटुंबाच्या पाठीमागे असल्याचे सांगितले. आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी यावेळी वर्षाताई जगदाळे यांनी केली असून आरोपींना अटक न केल्यास थेट राज्याचे गृहमंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याकडेच तक्रार करणार असल्याचे वर्षाचे जगदाळे यांनी म्हटले आहे.
बीड जिल्ह्यात मागील काही काळापासून गुन्हेगारीने डोके वरती काढले आहेत. गुंड माफिया पोलीस प्रशासनाला जुमानत नसल्याचे दिसत आहे. खून, मारामाऱ्या, यासह छेडछाड करण्याचे प्रकार वाढले आहे. अश्विनी अंजान या वकील महिलेस गावातील आठ ते दहा पुरुष राजकीय मंडळींनी मारहाण करण्याचे प्रकरण घडले आहे. गावात कायद्यानुसार स्पीकर बंद करण्याची मागणी ही महिला करत होती. मात्र गावातील अनेक कामात हस्तक्षेप करत असल्याचा राग सरपंच व काही लोकांना होता यामुळेच या महिला वकीलस सबक शिकविण्याच्या देशाने हनुमान जयंती दिवशी शेतात जात असलेल्या अश्विनी अंजान या वकील महिलेस चेन्नई रोडवर अडवत तू आमच्या विरोधात जातेस का तुला दाखवावच लागेल असे म्हणत जेसीपी पाईप ने गोल रिंगण करत आठ ते दहा लोकांनी मारहाण केली. ही घटना दाबण्याचा प्रयत्न करण्यात आला गुन्हा नोंद करण्यासही टाळाटाळ केली गेली. या प्रकरणाची माहिती प्रसार माध्यमांना झाल्यानंतर याची वाचता झाली. सदरील प्रकरण हे अत्यंत गंभीर असून या प्रकरणाकडे पोलीस प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे का असा प्रश्न उपस्थित होत असून पोलिसांना राजकीय प्रेशर आहे का ? वकील महिला मारहाण प्रकरणात बीड जिल्ह्यातील महिलांनी आवाज उठवला असून वेगवेगळ्या महिला संघटनांनी याचा तीव्र शब्दात निषेध केला असून अश्विनी अंजान या महिला वकिलास न्याय मिळावा यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न केले जात आहे. सनगाव येथील घटनेने बीड जिल्हा पुणे बदनाम झाला आहे या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांनी थेट सनगाव गाठत पीडित कुटुंबीयांची भेट घेतली यावेळी त्यांच्या कुटुंबीयांकडून सर्व हकीकत कळाली पोलिसांनी अद्यापही आरोपींना अटक न केल्याने पीडित कुटुंब न्याय च्या प्रतीक्षेत आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत यांच्याकडे प्रकरणाचा जलद तपास व आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी लवकरच भेट घेणार असल्याचे जगदाळे यांनी म्हटले आहे. अश्विनी अंजान या महिला कोकिलास जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत महाराष्ट्र नवनिर्माण सेना शांत बसणार नसल्याचे वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले असून आरोपींना तात्काळ अटक न केल्यास जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय समोर मनसे आंदोलन करणार असल्याचेही जगदाळे यांनी म्हटले आहे.



# शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या निवासस्थानी मंत्री उदय सामंत यांची भेट

## शिवसेना नेतृत्व बीडमध्ये मुळुक यांच्या कायम पाठीशी : सामंत

बीड । प्रतिनिधी
शिवसेनेवर कितीही संकटे आली तरी त्याला सामोरे जाण्यासाठी आम्ही सर्व निष्ठावंत सज्ज आहोत. शिवसेना नेतृत्व बीडमध्ये मुळुक यांच्या कायम पाठीशी असे प्रतिपादन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केले. शिवसेना नेते तथा उद्योग मंत्री उदय सामंत हे बीड दौऱ्यावर असताना त्यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी मुळूक परिवाराच्या वतीने सामंत यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.
उदय सामंत हे शिवसैनिक म्हणून कार्यरत असतानापासून त्यांचे आणि सचिन मुळूक यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. शिवसेनेवरील निष्ठेमुळे शिवसेनेचे मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सामंत हे सध्या राज्याचे उद्योग मंत्री म्हणून भरीव काम करत आहेत. पूर्वाश्रमीचे शिवसैनिक असलेले उदय सामंत यांनी आजही मुळूक यांच्यावरील प्रेम तसूभरही कमी झाले नसल्याचे त्यांनी दाखवून दिले. गुंतवणूक परिषदेच्या निमित्ताने उद्योग मंत्री उदय सामंत बीड दौऱ्यावर आले असता जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केलेल्या विनंतीला मान देत सामंत यांनी तात्काळ सर्व प्रोटोकॉल डावलून मुळूक यांच्या निवासस्थानी भेट दिली आणि सामंत, मुळूक परिवारातील गोडवा कायम ठेवला. यावेळी मंत्री उदय सामंत, खासदार संदीपान भुमरे छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रमुख राजेंद्र जंजाळ यांचे बीडचे शिवसेनेचे पहिले नगराध्यक्ष शिवलाल मुळूक, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक व सर्व मुळूक कुटुंबीयांनी स्वागत केले. यावेळी उदय सामंत यांनी मुळूक यांच्या सारख्या कार्यकर्त्यांची वज्रमुठ शिवसेना व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत कायम आहे असे सांगितले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर आदी उपस्थित होते.

# वडगांव ढोक ग्रामस्थांची भगवानगडाला १ कोटी ४५ लाख रुपये देणगी जाहीर

## करोडो रुपयांचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन

भगवानगड । प्रतिनिधी
श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ




एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.
श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे वडगांव ढोक (ता.गेवराई जि.बीड) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही १कोटी ४५ लाख रुपये झाली. नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# गटविकास अधिकारी कांबळे मॅडम तलवाडाचे ग्राम विकास अधिकारी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करणार का?

# ढिसाळ कारभार पाहून उपसरपंचने ग्रामपंचायतला लावले कुलूप

तलवाडा । प्रतिनिधी
ग्रामविकास अधिकारी यांची बदली होऊन त्यांच्या जागेवर मुसळे ग्रामसेवक यांची नियुक्ती करण्यात आली परंतु सतरा दिवस उलटून गेले तरी अद्याप पाटील ग्रामसेवक यांनी चार्ज दिला नसल्याचे समोर आले आहे. बदली होऊन ही अद्याप तलवाडा ग्रामपंचायत चां कारभार पाटील हेच पाहत असून गटविकास अधिकारी यांच्या आदेशाला एक प्रकारे डावलण्याचे काम होतांना दिसते. या काळात अनेक कामे होत नसल्याचा आरोप उपसरपंच यांनी केला असून ग्रामपंचायत ला कुलूप लावले आहे. जोपर्यंत पाटील ग्रामसेवक चार्ज देत नाहीत तो पर्यंत कुलूप उघडू देणार नसल्याचे सत्ताधारी उपसरपंच आक्रम सौदागर यांनी सांगितले.
तलवाडा ग्रामपंचायतीच्या कामाविषयी जनतेत मागील



चार वर्षापासून रोष आहे सामान्य जनतेची कामे ग्रामपंचायत मध्ये झालीच नाही, ग्राम पंचायत ही ग्रामीण भागातील लोकांच्या सक्षम तेचा कणा समजला जातो परंतु याला गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत आपवाद आहे कारण याठिकाणी सामान्य जनतेचे कोणतेच काम विणा मोबदला होत नाही, साधे जन्म किंव्हा मृत्यू प्रमाण घ्यावयाचे असेल तर दोन ते तीन हजार रुपये द्यावे लागते ही वस्तुस्थिती आहे याकडे, सरपंच आणि ग्रामविकास अधिकारी यांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष आहे. याचे प्रत्यक्ष उदाऱ्हरण द्यायचे असेल तर रेकॉर्ड तपासणी करावे तेव्हा सर्व समोर येईल ही वस्तुस्थिती आहे. परंतु याकडे ना सरपंच लक्ष देतो ना ग्रामविकास अधिकारी ना पंचायत समितीचे अधिकारी त्यामुळे गटविकास अधिकारी यांनी सर्व रेकॉर्ड तपासावे अशी मागणी अनेक वेळा ग्रामपंचायत सदस्य यांच्या सह सामान्य जनतेकडून होत असून बदली झालेले ग्रामविकास अधिकारी यांना बदलीचे आदेश देवून ही चार्ज दिला नसल्याने शिस्तभंगाची कार्यवाही होते की नाही हे पहावे लागेल.

# माली पारगाव येथील शेतकऱ्यांचे कॅनलला पाणी सोडण्यासाठी पाटबंधारे विभागाला विनंती

माजलगाव । प्रतिनिधी
माजलगाव तालुक्यातील मालीपारगाव येथील शेतकऱ्यांनी शेतीला लागणाऱ्या पाण्यासाठी नियोजित ठरलेल्या रोटेशन तारखाप्रमाणे पाणी कॅनलला सोडण्यात याव यासाठी मालीपारगाव कॅम्प येथे पाटात उतरुन माली पारगाव चे शेतकरीयांनी पाटबंधारे विभागाला पाणी सोडण्याचे आवाहन केले आहे. जर



ठरलेल्या रोटेशन प्रमाणे न पाणी सोडल्यात याहून अधिक मोठया प्रमाणात तीव्र आंदोलन करू असा इशारा माली पारगाव येथील शेतकऱ्यांनी दिला आहे. यावेळी निलराम ढेके, सुग्रीव कदम, विजय गायकवाड, अमोल गायकवाड, माऊली रदे, अशोक शिंदे, बालाजी सोजे, अंनत बागवले आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वीय सहाय्यक बालासाहेब निकम यांची रविंद्र शिनगारे अध्यक्ष पोलीस बॉईज असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांनी घेतली सदिच्छा भेट.

# रणजीत कासले विरुद्ध निवडणूक विभागाकडून परळीत गुन्हा दाखल

परळी वैजनाथ । प्रतिनिधी
दिनांक १९ शनिवार रोजी परळी येथे गेल्या काही दिवसापासून सोशल मीडियावर बेताल व निराधार विधान करणाऱ्या बीड पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले यांनी परळी विधानसभा निवडणुकीचा संदर्भात आणि ईव्हीएम मशीनमध्ये छेडछाड झाल्याबाबत संभ्रम निर्माण करणारी वक्तव्य केली होती.
या पार्श्वभूमीवरआता निवडणूक विभागाने त्यांच्या विरोधात परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. वास्तविक पाहता निवडणूक प्रक्रियाअतिशय पारदर्शकपणे आणि काटेकोरपणे पार पडली असून कासले यांनीसोशल मीडियावर ईव्हीएम चेडा छेडी बाबत सतत त्यांनी चुकीचे विधान करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण केला आहे. या तक्रारीच्याआधारे पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले यांच्याविरुद्ध गु. र. न.८४/२०२५ नुसार इछड कलम.१७५.३३६(.४) ३५३ ( १ ) (ख)१९८.३५६(२).१९७(१). अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे व पोलीस उपनिरीक्षक राठोड करत आहेत.



**रंजीत कासले चा खरा चेहरा उघड**

बडतर्फ पोलीस उप निरीक्षक रंजीत कासले यांच्या विरोधात आणखी एक धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. कासले यांनी स्वतःच्या खात्यात धनंजय मुंडे यांच्या लोकांनी दहा लाख रुपये पाठवले असल्याचा दावा केला होता. मात्र प्रत्यक्षात हे पैसे अंबाजोगाई येथील संत बाळूमामा कन्ट्रक्शन चे मालक सुदर्शन काळे यांनी पाठवली असल्याचे समोर आले आहे.पोलीस सूत्राच्या मिळालेल्या माहितीनुसार परळी विधानसभा निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार अण्णा वंजारे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार रंजीत कासले यांनी निवडणूक आयोग आणि शासनाविषयी बदनामीकारक व खोटी विधान करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण केला आहे. लोकसेवक असतानाही त्यांनी भारताची सर्व भूमात्व आणि सुरक्षितता धोक्यात येईल अशी वक्तव्य करून निकाळजीपणा दाखवला. कासले यांनी असेही म्हटले आहे. की.त्यांच्या बँक खात्यात २१ नोव्हेंबर २०२४ रोजी दहा लाख रुपये जमा झाले होते.आणि हे पैसे परळी विधानसभा निवडणुकीतील ईव्हीएम मशीन पासून दूर राहण्यासाठी आणि छेडाछेडीवर गप्प बसण्यासाठी दिले होते, असा दावा त्यांनी केला होता. त्यांच्या वक्तव्यामुळे निवडणूक प्रक्रिया बद्दल जनतेमध्ये संशय निर्माण होऊ शकतो. तसेच निवडणूक आयोग आणि शासनाची विश्वशारता धोक्यात येऊ शकते. याप्रकरणी सुदर्शन काळे यांनी आता पोलिसाकडे अधिकृत तक्रार दाखल केली असून त्यांनी पैसे दिल्याचे पुरावे ही सोबत सादर केले आहेत.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT